सं. फौजदारी खटला क्र. **११८०/२०२२**
गजानन विरूद्ध वैजनाथ
**निशाणी ४१ खाली**

**बचाव पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ संतोष दत्तराव कोळेकर याची उर्वरित सरतपासणी आरोपी तर्फे ॲड श्री. एम. झेड. राठी यांचे मार्फत.**

२. मला बॅकेच्या दैनंदिन व्यवहाराची संपुर्ण माहिती आहे. आमच्या बॅकेचे दैनंदिन व्यवहाराची माहिती आमचे क्लार्क संगणकामध्ये भरत असतात व सदर माहिती मी तपासत असतो. आता मला आरोपीचा दि. २०/०७/२०२० ते १९/०७/२०२१ या कालावधीचा संगणकावरून प्राप्त केलेला खातेउतारा दाखवण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, सदर खातेउता—यातील माहिती व आमच्या बॅकेत उपलब्ध माहिती सारखीच आहे. सदर खातेउता—यासोबत मी माझे भा.पु.का चे कलम ६५ब अन्वये प्रमाणपत्र जोडले आहे. आरोपीचा दि. २०/०७/२०२० ते १९/०७/२०२१ या कालावधीचा संगणकावरून प्राप्त केलेल्या खातेउतार—यास **निशाणी ४६** व भा.पु.का चे कलम ६५ब अन्वये देण्यात आलेल्या प्रमाणपत्र **निशाणी ४७** देण्यात येते. सदर खातेउता—यानुसार दि. ३१/०७/२०२० रोजी आरोपीच्या खात्यात तीन व्यवहार झालेले असुन गजानन नामक यु.पी.आय आयडीवरून आरोपीच्या खात्यात अनुक्रमे रू.५०,०००/—, रू.२५,०००/— व रू.५,०००/— जमा झाले होते. तसेच सदर खातेउता—यानुसार दि. ०१/०८/२०२० रोजी आरोपीच्या खात्यात एकुण सात व्यवहार झालेले असुन त्यापैकी एक व्यवहार गजानन नामक यु.पी.आय आयडीवरून आरोपीच्या खात्यात रू.२०,०००/— जमा झाल्याचे दर्शवित आहे. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — आरोपीतर्फे ॲड. एस.एस. चांडक यांच्या मार्फत —**

३. मी बॅकेत उप—व्यवस्थापक म्हणुन कार्यरत आहे. मी तेल्हारा येथील शाखेत ऑक्टोबर २०२३ पासुन कार्यरत आहे. प्रस्तुत प्रकरणी मी मला पुरावा देण्याचे अधिकार असल्याबाबत पत्र अभिलेखावर दाखल केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरणातील धनादेश सन २०२२ चा आहे. आमच्या बॅकेत आरोपीचे

किती खाते आहेत हे मला माहित नाही. निशाणी ४६ वरील खातेउतारा आरोपीचा त्यावर नमुद असलेल्या खाते क्रमांकाचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी ४७ मध्ये निशाणी ४६ वरील खाते क्रमांक नमुद नाही. **उलटतपास पुर्ण.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. १०.१२.२०२५ (ए.ए. माळी)
अकोट न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र. २)
अकोट, ता. आकोट, जि. अकोला.